# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २४० वा ❑ मंगळवार दि.१८ नोव्हेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## थिमक्का या वृक्षमातेची प्रेरणादायी कहाणी

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

कर्नाटकातील ११४ वर्षीय सालुमारदा थिम्मक्का ही एक महिला आहे ज्यांनी आपले जीवन पर्यावरण संरक्षणासाठी समर्पित केले.

लहानपणी, थिमक्का यांना कोणतेही औपचारिक शिक्षण मिळाले नाही आणि त्यांनी एका खाणीत काम केले. त्यांना मूल नसल्यामुळे अनेकदा दुःख होत असे, परंतु त्यांच्या पतीच्या पाठिंब्याने त्यांना झाडे लावण्यात समाधान मिळाले आणि त्यांनी १९११ मध्ये झाडे लावण्यास सुरुवात केली.

त्यांच्या च्या आयुष्यात त्यांनी हजारो झाडे लावली आणि इतरांना प्रेरणा दिली. थिम्मक्का यांनी केवळ पर्यावरण वाचवण्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले नाही तर समाजात एक व्यक्ती देखील महत्त्वपूर्ण बदल घडवू शकते हे देखील सिद्ध केले.

कर्नाटकातील रहिवासी असलेल्या सालुमारदा थीमका या पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्त्या होत्या.नुकतंच त्यांचं ११४ वर्षी निधन झालं

त्यांनी ४०० वटवृक्षांसह ८,००० हून अधिक झाडे लावली आहेत, ज्यामुळे त्यांना ''वृक्षमाता'' ही पदवी मिळाली आहे. त्यांनी सुमारे ४ किलोमीटर परिसरात झाडे लावली आहेत, ज्यामुळे हा परिसर हिरवागार झाला आहे. निसर्गावरील तिच्या प्रेमाची जाणीव ठेवून, थीमका यांना ''सालुमारदा'' असे टोपणनाव देण्यात आले. सालुमारदा हा कन्नड शब्द आहे ज्याचा अर्थ ''झाडांची रांग'' असा होतो आणि हे नाव लवकरच लोकप्रिय झाले. त्यांना पद्मश्रीसह अनेक पुरस्कार मिळाले आहेत.भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार देऊन पुरस्कृत केले.

थीमाक्काची कहाणी संयम आणि दृढनिश्चयाची आहे, ज्यामुळे तिला जगभर प्रसिद्धी मिळाली आहे. एकेकाळी थीमाक्का साधे जीवन जगत होती. लग्नानंतरही तिला मूल होऊ शकले नाही. जेव्हा ती तिच्या चौथ्या दशकात होती, तेव्हा मूल नसल्याच्या दुःखाने तिने आत्महत्या करण्याचा विचार केला. तथापि, तिच्या पतीच्या पाठिंब्याने तिला झाडे लावण्यात समाधान मिळाले. तेव्हापासून, तिने तिचे संपूर्ण आयुष्य वृक्षारोपणासाठी समर्पित केले आहे. ती तिच्या पतीसोबत दररोज बाहेर जायची आणि शक्य असेल तिथे झाडे लावायची. अशा प्रकारे, तिने अंदाजे ८,००० झाडे लावली आहेत. तिने ६५ वर्षांत हे यश मिळवले. तिच्या पतीचे १९९१ मध्ये निधन झाले.

थिम्मक्का यांना अनेक प्रतिष्ठित सन्मान मिळाले, ज्यात राष्ट्रीय नागरिक पुरस्कार (१९९५), इंदिरा प्रियदर्शिनी वृक्ष मित्र पुरस्कार (१९९७), नादोजा पुरस्कार आणि राज्योत्सव पुरस्कार यांचा समावेश आहे. २०१९ मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०२० मध्ये, कर्नाटक केंद्रीय विद्यापीठाने त्यांना मानद डॉक्टरेट पदवी प्रदान केली. पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक कार्यासाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

थिमक्का यांचे जीवन संदेश देते की एक सामान्य माणूस देखील दृढनिश्चयाने पर्यावरण संरक्षणात मोठे योगदान देऊ शकतो आणि निसर्ग ही आपली खरी आई आहे, जी वाचवणे आपले कर्तव्य आहे.






# प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर यांना राष्ट्रीय माध्यम परिषदेचा जीवनगौरव पुरस्कार

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**पुणे** – ओरिसाची राजधानी भुवनेश्वर येथे दि. २१ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान होत असलेल्या ९ व्या राष्ट्रीय माध्यम परिषदेच्या वतीने प्रा.डॉ. वि. ल. धारूरकर यांना जीवनगौरव पुरस्कार घोषित करण्यात आला आहे. राष्ट्रीय माध्यम परिषदेचे अध्यक्ष प्रा डॉ. उपेंद्र पाढी यांनी त्यांना विशेष पत्र लिहून अभिनंदन केले आहे.

राष्ट्रीय माध्यम परिषद ही भारतामधील माध्यम व जनसंवाद शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च शिखर संस्था असून, या परिषदेचे २०१७ पासून नियमित अधिवेशन होत असते. डॉ. धारूरकर यांनी आजवर झालेल्या सर्व परिषदांमध्ये उपस्थित राहून सत्रांचे अध्यक्षपद भूषविले आहे तसेच विशेष व्याख्यानेही दिली आहेत.

या परिषदेमध्ये डॉ. धारूरकर हे प्रा. सुनील बेहरा स्मृतीप्रित्यर्थ व्याख्यान देणार असून, त्यासाठी द जेनेसिस ऑफ फेक न्यूज या विषयावर ते विशेष उद्बोधन करणार आहेत. आजवर डॉ. धारूरकर यांनी प्रसार माध्यमांच्या क्षेत्रात ५० पेक्षा अधिक ग्रंथ लिहिले असून, नुकताच त्यांनी लिहिलेला जर्नालिझम इन २१ सेंचुरी हा ८६० पानांचा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. कणाद टू कलाम : नो आयडिया, नो इनोव्हेशन क्रिटिकल थिंकिंग इन इंडियन कंटेक्स्ट



हा त्यांचा ग्रंथही प्रकाशनाच्या मार्गावर आहे. या परिषदेत डॉ. धारूरकर यांच्या सन्मानार्थ मास कम्युनिकेशन इन इंडिया : द चेंजिंग सिनेरिओ हा विशेष ग्रंथ प्रकाशित केला जाणार आहे व त्यात देशभरातील विद्वान संशोधकांचे माध्यम ०.५ या विषयांवर लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. सध्या डॉ. धारूरकर हे एमजीएम विद्यापीठात एमीरिटस प्रोफेसर असून, ते पुणे येथील भारतीय ज्ञान संस्थेचे संशोधन व विकास संचालक म्हणूनही काम पहात आहेत. त्यांनी यूजीसी, अकॅडमी स्टाफ कॉलेजचे संचालक म्हणून पाच वर्षे काम केले आहे तसेच १९८० पासून २०१८ पर्यंत त्यांनी जनसंवाद आणि वृत्तपत्र विद्या विभागात प्रोफेसर म्हणून कार्य केले आहे. त्यांनी अमेरिका, इटली, जर्मनी, चीन, जपान इत्यादी देशांना भेटी देऊन संशोधन पत्रिका सादर केल्या आहेत. यापूर्वी त्यांना यूजीसी यंग सायंटिस्ट अ‍ॅवॉर्ड, जैन विद्याभूषण पुरस्कार, मराठवाडारत्न पुरस्कार आदी पुरस्कारांनी विभूषित करण्यात आले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली देशभरातील अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत. त्यांच्या या निवडीमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या जनसंवाद वृत्तपत्र विद्याभागाचा नावलौकिक देशभर पसरला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांच्या चाहत्यांकडून विशेष अभिनंदन होत आहे.

# आपेगावात संत ज्ञानेश्वर माऊलीच्या मूर्तीवर किरणोत्सव

## आज समारोप हजारो भाविकांच्या उपस्थितीत संजीवन समाधी सोहळा श्रीविष्णू रूपात पूजा

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**आपेगाव (अनंत दसरे)**– पैठण तालुक्यातील आपेगाव येथील संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जन्मभूमीत माऊलीचा संजीवन समाधी सोहळा सुरू असून या सोहळ्यात तीन दिवस सूर्यदर्शन प्रसंगी माऊलीच्या मूर्तीवर किरणोत्सव बघायला मिळत असल्याने या ठिकाणी दररोज हजारो भाविक वारकरी माऊलीच्या दर्शनासाठी गर्दी करत आहेत. यावर्षी माऊली श्रीविष्णूच्या रूपात गरुडावर विराजमान हातात शंख चक्र अशा स्वरूपाची पूजा बांधण्यात आली आहे. माऊलीच्या समाधी सोहळा काळात रोज एक प्रमाणे सात दिवस नवीन पेहराव करून फेटा परिधान करून नवीन रूपात सजवले जाते, कधी कधी पैठणी कधी पेशवाई रंगीबेरंगी फ ेट्यामुळे माऊलीचे गुजर वाणी बालक रूप न्याहाळताना वारकरी मंत्रमुग्ध होऊन जातात आज सोमवारी संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळा सांगता होणार आहे या समाधी सोहळ्याचे व काल्या काल्याचे किर्तन होणार आहे.





# प्रा. डॉ. अनिल क्षिरसागर काळाच्या पडद्याआड

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**धुळे** – आपल्या सर्वांचे जिवलग स्नेही, अभ्यासक, संशोधक तसेच लेखक, शांत आणि संयमी स्वभावाचे व्यक्तिमत्त्व असलेले प्रो. डॉ. अनिल क्षीरसागर सर यांचे दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले.



दिनांक ८ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री सुमारे ७.०० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील सिटी केअर हॉस्पिटलमध्ये त्यांना ब्रेन स्ट्रोक आल्यामुळे दाखल करण्यात आले होते. तेव्हापासून त्यांच्यावर उपचार सुरू होते; परंतु दुर्दैवाने त्यातून ते सावरू शकले नाहीत आणि आज ते आपल्या सर्वांना कायमचे सोडून गेले.

त्यांचं निधन ही केवळ एका प्राध्यापकाची हानी नाही, तर ज्ञान, निसर्ग आणि माणुसकीच्या संगमावर उभं राहून माणुसकीचा दीप प्रज्वलित करणाऱ्या एका असामान्य व्यक्तीमत्त्वाचं विझणं आहे.

विज्ञानाच्या प्रेमात झोकून दिलेलं आयुष्य वनस्पतीशास्त्र हा त्यांचा विषय होता, पण निसर्ग हेच त्यांचं जीवन होतं. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाची नवचेतना जागवली. अलीकडेच त्यांनी वनस्पतीशास्त्र विषयावर आधारित चार अत्यंत महत्त्वपूर्ण पुस्तके प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले सर यांच्या हस्ते प्रकाशित केली:

१. अपुष्प वनस्पतीतील विविधता) २. वनस्पतींचे पर्यावरणशास्त्र ३. अनावृतबीज वनस्पती व पुरावनस्पतीशास्त्र ४. वनस्पती शरीरशास्त्र ही केवळ शैक्षणिक पुस्तके नव्हती; ती त्यांच्या ज्ञान, परिश्रम आणि विद्यार्थ्यांवरील प्रेमाची सजीव उदाहरणे होती. विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत विषय समजावा, हा त्यांचा जिव्हाळ्याचा प्रयत्न असे. ते नेहमी म्हणायचे ''शिकवणं म्हणजे फक्त माहिती देणं नाही, तर विचार जागवणं आहे.'' हे मी स्वतः जवळून अनुभवले आहे. निसर्गाशी आत्मीयतेचं नातं त्यांना निसर्गाशी संवाद साधायला फार आवडायचं.

महाविद्यालयाच्या बागेत फ ुलणाऱ्या फुलांशी, वेलींशी, झाडांशी आणि वनस्पतींशी त्यांचं एक आत्मीय नातं होतं.

विद्यार्थ्यांना ते सांगायचे ''ही फुले जशी शांततेने उमलतात, तशीच आपली ज्ञानफुलेही विनम्रतेने उमलली पाहिजेत.''

त्यांच्या देखरेखीखाली फ ुललेला वनस्पती उद्यान (बॉलानिकेल गार्डन) आजही त्यांच्या उपस्थितीची आठवण करून देतो. सरांना शेकडो औषधी वनस्पतींचे ज्ञान होते. प्रवासात किंवा रोजच्या संभाषणात ते कोणती वनस्पती कोणत्या आजारावर उपयुक्त ठरते हे अचूक सांगायचे.

विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक, मित्र आणि प्रेरणास्थान

त्यांच्या वर्गात शिस्त होती, त्यांच्या बोलण्यात प्रेम होतं पण ते प्रेम शिस्तीने गुंफलेलं होतं. ते विद्यार्थ्यांना नेहमी सांगायचे

''गरिबीत जन्म हा दोष नाही, पण ज्ञानाशिवाय जगणं हा खरा अपराध आहे.''

सामाजिक व पर्यावरणीय संवेदनशीलता

डॉ. क्षीरसागर हे केवळ शिक्षक नव्हते; ते निसर्गरक्षक आणि सामाजिक भान असलेले संवेदनशील व्यक्ती होते.

दिव्य मराठीच्या 'एक वृक्ष, एक जीवन' या उपक्रमात त्यांनी सहभाग घेतला आणि तुळशीचे बीज लावून सर्वांना पर्यावरणाचे भान दिले.

निसर्गात रमणारा शोधक

**कवी प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर**

ते 'संडे ट्रेकिंग ग्रुप' सोबत ''अंधारबन''सारख्या जंगलांच्या सफरीला जात असत. वनस्पतींचं निरीक्षण, त्यांचं छायाचित्रण आणि सहप्रवाशांसोबतचा संवाद हेच त्यांचं आवडतं जग होतं.

निसर्गात ते संशोधक असायचे, पण त्या संशोधनाच्या पलीकडे ते एक साधे, नम्र आणि मृदुभाषी माणूस होय. आज ते आपल्यात नाहीत, परंतु त्यांच्या आठवणी, त्यांचं शिकवणं आणि त्यांनी दिलेलं प्रेरणादायी विचारधन आपल्या हृदयात कायमस्वरूपी जिवंत राहील. प्रा. डॉ. अनिल क्षीरसागर सरांना भावपूर्ण श्रद्धांजली

# वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-९५



*"बुध" सूर्यमालेतील सर्वात छोटा ग्रह असून सर्व ग्रहांच्या तुलनेत सूर्यापासूनचे अंतर खूपच जवळ असलेला हा ग्रह अहे. बुध, शुक्र, पृथ्वी आणि मंगळ या चार घन पृष्ठभाग असणाऱ्या ग्रहांपैकी एक आहे. इतर ग्रहांचे पृष्ठभाग द्रवरूप किंवा गोठलेल्या द्रवरूपात आहेत.*

*'बुध' या ग्रहाला देव म्हणून मानलेले आहे. बुद्धिमत्तेचे प्रतिनिधीत्व करणारा हा देव आहे. 'सोमय' आणि 'रोहिणाय' असेही बुध' ग्रहाला म्हणतात. आश्लेषा, ज्येष्ठा आणि रेवती या नक्षत्रांवर बुध राज्य करतो असं ज्योतिषशास्त्र सांगते*

*"वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये कुंडलीतील 'बुध' ग्रहाचे स्थान कसे आहे आणि कुठे आहे? हे जाणून घेवून त्यानुसार रंगाकार निश्चित केले की त्याचे लाभही तितक्याच प्रमाणात प्राप्त होतात. असे अनुभव आहेत. व्यापारात वृद्धी, झाली वक्तृत्व आणि संवादावर यशस्वी प्रभुत्व, प्रवासाचा कारक आणि प्रभावी संदेशवाहक बनवतो. बुधाचा जप,"ॐ श्री बुधाय नम:" या जपाने बुधाची उपासना केली जाते.*

*बुध हा मिथुन आणि कन्या या दोन्ही जातकांच्या कुंडलीत प्रभारी असेल तर तो, जातकाची उत्सुकता, सुसंवादी आणि जुळवून घेणारे अशा स्वभावाचे बनवतो. कांही गुण थोडे त्रासदायकही असतात मात्र "वास्तुशास्त्र पेंटींग" मुळे जातकातील अनिर्णयकता कमी कमी होत जाते. टीका आणि चिंताग्रस्तता देखील कमी कमी होत जाते.*

*चंद्र आणि रोहिणी यांचा पुत्र बुध आहे. त्याला नवग्रहांचा राजकुमार म्हणून ओळखला जातो. बुद्धी, वाणी आणि व्यवसायासाठी त्याची पूजा केली जाते. कुंडलीत बुध जेव्हा बलवान असतो तेव्हा यश आणि प्रसिद्धी प्राप्त होते. बुध हवा किंवा वेग यांचा देव आहे. म्हणून "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये त्याच्या स्थिती नुसार कांही संकल्पन आपण चितारीत असतो. त्यामुळे एक उर्जादायक अशा प्रकारचे सकारात्मक वातावरण तयार होते. चंचलता, अस्थिरता आप दोलायमानता कमी कमी होऊन जातकाला स्वत:लाच खूप समाधान मिळते.*

क्रमश :

**द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान**
**डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238**



# जात्यावरच्या ओव्या......


दिवाळसणाला
ये ना भाऊ रे मुर्हाळी
असा सासुरवास,,
सारी सुकली हराळी ||३४९||

दिवाळसणाला
बाबा, या ना घ्यायला,,
वाट पाहून,,पाहून,,
साल सरल भेटीला,, ||३५०||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# संगीत देवबाभळी : एक थरारून सोडणारा नाट्यानुभव

ज्योतिर्मय साहित्य




आवलीचा तुकारामबुवांवर राग आहे तसाच रुख्मिणीचा सुद्धा विठ्ठलावर आहे. पंढरपुरात विठ्ठल आणि रुख्मिणीची देऊळं वेगवेगळी आहेत. विठल हा श्रीकृष्णाचाच अवतार आहे. श्रीकृष्ण जेव्हा द्वारकेला आला, तेव्हाही त्याने राधेशी असणारी प्रीती, स्नेहभाव कायमच ठेवला होता. त्यामुळे रुख्मिणी रागावून दिंडीर वनात निघून गेली होती. तोच संदर्भ इथे आहे. या कारणानेच रुख्मिणी विठ्ठलावर नाराज आहे. विठ्ठलाला आपल्यापेक्षा आपले भक्त अधिक प्रिय आहेत अशी तिची तक्रार आहे. विठ्ठलाने जेव्हा आवलीच्या पायातला काटा काढला, तेव्हा स्त्री सुलभ भावनेतून रुख्मिणी बघायला आली की कोण ही की जिच्या पायातला काटा आपला पती काढतो आहे. आवली त्याच्या भक्ताची पत्नी आहे. त्याची काळजी घेणारी ती आहे. ती गर्भार अवस्थेतही आपल्या पतीला जेवण घेऊन येते. म्हणून विठुराया रुख्मिणीला आवलीच्या घरी जाऊन तिची सेवा करायला सांगतो.




अशा या परिस्थितीत आवली आणि रुख्मिणी जवळ येतात. एकमेकींची दुःख समजून घेतात. त्यांच्यातील संवाद हृदयस्पर्शी तर आहेतच पण खूप काही सांगून जाणारे आहेत. तुकाराम बुवा घरात अजिबात लक्ष देत नाहीत. त्यांच्या स्वयंपाकघरातील डबे, भांडी रिकामी आहेत. खरं तर आवलीच माहेर श्रीमंत होतं. ती आपल्या माहेरी परत जाऊ शकली असती. रुख्मिणी तिला विचारते, मग काय आहे तुमच्याकडे ? कसा चालतो तुमचा संसार ? त्यावेळी आवली उपरोधिकपणे तुकारामबुवांचा अभंग वापरून उत्तर देते, आम्हां घरी धन शब्दांचीच रत्ने... त्यावेळी प्रेक्षक अंतर्मुख होतात.

रुख्मिणी विचारते, मग तू निघून का जात नाहीस ? त्यावर आवलीने दिलेले उत्तर सर्वांच्याच डोळ्यात अंजन घालणारे आहे. ती म्हणते, निघून जाऊन काय करू ? मी आहे म्हणून त्यांना जेवण तरी मिळते. माझ्यासारख्या सामान्य स्त्रीला रुसून निघून जाण्याचा अधिकार कुठे आहे ? मी काही रुख्मिणी थोडीच आहे रुसून निघून जायला ? आणि निघून गेल्यावर घरी परत यावंसं वाटलं तर आल्यावर घर तरी जागेवर असेल का ? मग कुठे जायचं ? यातून तिने रुख्मिणीला बोध तर केला आहेच पण आजकाल क्षुल्लक कारणावरून नवऱ्यावर चिडून घरातून निघून जाणाऱ्या मुली, काही झाले की लगेच घटस्फोट घेणाऱ्या मुली यांच्यासाठीही दोन मोलाचे शब्द यातून तिने सुनावले आहेत असे वाटते. एकदा का घर सोडून निघून गेल्या आणि नंतर परत यावेसे वाटले तरी घर ( पती ) जागेवर असेलच याची शाश्वती कोणी द्यावी ?

(क्रमशः)



# दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# मायाब्रम्हनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

२०) ब्रम्ह वाणीने वर्णन करून सांगता येण्यासारखे नाही ।ब्रम्ह काळाच्या सत्तेच्या पलीकडे आहे. माया जसें तिचे वर्णन करावे तशी असते. ब्रम्ह काळाच्या सत्येच्या पलीकडे आहे, तर माया म्हणजे काळाचे भक्ष्य आहे.

२१) ब्रम्ह हे कधीच संपत नाही, ते नष्ट होत नाही, ते नष्ट होत नाही ,नाश पावत नाही ते आहे त्याच स्वरूपात रहाते.ते अभंग व अनादी आहे. ते जसे आहे तसेचं सदैव रहाते.

तर या ऊलट माया पालटू शकते ती एका ठिकाणी स्थिर नसते.अनेक प्रकारची रंगरूपे तयार करणे हा मायेचा खेळ आहे. ती शाश्वत नाही. या संपूर्ण विश्वामध्यें जे जे काही सचेतन व अचेतन दिसते आणि बदलत जाऊन नाश पावते ते ते तत्व म्हणजे ‘‘माया‘‘होय.

२२) आपणास दिसत असलेल्या संपूर्ण विश्वाच्या बंधनाच्या सीमांच्या पलीकडे परमात्मा स्थिरपणे आपल्या कडे पहातो आहे तो सगळ्यात असून देखील वेगळा भासतो तोच हा परमेश्वर होय त्यालाच आपण ओळखले पाहिजे.

संतांच्या विचाराने जर आपण जन्मभर आचरण करून जीवन जगलो तर परमात्म्याला शरण जावे. ‘‘जन्ममरणाच्या‘‘तावडीतून सुटका करून घ्यावी व मोक्ष मिळवावा. परत परत जन्ममरणाच्या फे-यात अडकून पडू नये. यासाठी तरी सत्संग धरावा.


(क्रमशः)




## थकलो मी विठ्ठला

ये रे पांडुरंगा । ये तू झडकरी ।
नाव पैलतीरी । लाव माझी ॥१॥
मी तो एक पापी । पापे ही अनंत ।
कर त्यांचा अंत । विठुराया ॥२॥
तुझ्या भेटीसाठी । यायचो पंढरी ।
पण आता दूरी । फार वाटे ॥३॥
पाय ना चालती । पंढरीची वारी ।
थकलो मी भारी । आता फार ॥४॥
पंढरीच्या राया । दे मज दर्शन ।
करीन नमन । इथूनच ॥५॥
कंठी आले प्राण । वाट मी पाहतो ।
कधी उद्धारतो । विठु मला ॥६॥
माधव हा म्हणे । साहवेना दूरी ।
इच्छा कर पुरी । पांडुरंगा ॥७॥

# संत ‘तू भगवंताचा आहेस’ ही जाणीव देतात.



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

ज्योतिर्मय साहित्य

आपण कोणतेही कृत्य करीत असताना, ज्याकरिता ते कृत्य आरंभिले ते जसे आपल्या डोळ्यांसमोर असते, त्याप्रमाणे नाम घेताना, आपण नाम कशाकरिता घेतले त्याची अखंड जाणीव असावी. ही जाणीव अखंड ठेवणे, मी भगवंताचा आहे हे जाणणे, याचे नाव अनुसंधान ठेवणे. वास्तविक आपण भगवंताचे आहोतच, पण मी विषयाचा आहे असे भ्रमाने वाटू लागले. संत ‘तू विषयाचा नाहीस, भगवंताचा आहेस’ असे सांगतात. हीच संतांची खरी कामगिरी, आणि याकरिता ते नाम घ्यायला सांगतात. नाम घेणे म्हणजे ‘मी विषयाचा नाही, भगवंताचा आहे’ असे मनाला सांगणे आणि मनात तशी जाणीव उत्पन्न करणे; आणि ही जाणीव टिकविण्याकरिता पुन:पुन: मनाला तेच सांगणे, म्हणजे तेच नाम सतत घेणे.

तुम्हाला रामदर्शन पाहिजे म्हणता, पण राम तुम्हाला ओळखता कसा येणार ? रामदर्शन व्हायला रामाचे अंतर काटता आले पाहिजे; रामाला पक्के ओळखता आले पाहिजे. याकरिता अंत:करणाची पवित्रता पाहिजे; शुद्ध भाव पाहिजे. सर्व काही साधने केली, पण भाव नसेल तर ती व्यर्थ होतात. कालांतराने त्यामुळे भाव उत्पन्न होईल हे खरे. पण भाव ठेवून साधने केली म्हणजे प्राप्ती लवकर होते. नवविधा भक्तीमध्ये सोपी आणि मुख्य भक्ती म्हणजे अर्पण करणे ही होय. आपण सर्वस्वी देवाचे होऊन राहावे म्हणजे आपण जे काही करतो ते सर्व अर्पणच होते. ज्याने त्याने आपले हित ओळखून वागणे हे जरूर आहे. कल्याणाचा मार्ग कुणीही दाखवील, पण त्याप्रमाणे वागणे हे ज्याचे त्याच्याकडे आहे. बंधनाला खरे कारण परिस्थिती नसून आपल्याच मनाची ठेवण हे आहे. कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही काळात आणि वाटेल त्या अवस्थेत घेण्यासारखे एक भगवंताचे नाम तेवढे आहे. आहे त्या परिस्थितीत पूर्ण समाधान राहणे ही देवाची पूर्ण कृपा होय. अग्नीचा उपयोग तो करून घेणाऱ्यावर आहे; तसा देवाचा उपयोग जसा करावा तसा होतो. परमेश्वराच्या ध्यानाने सिद्धी येतात आणि सिद्धी तर त्याज्य; मग परमेश्वराचे ध्यान करूच नये की काय ? तर ध्यान हे सिद्धी मिळविण्याकरिता करू नये. परमेश्वर-प्राप्तीकरिता निष्कामबुद्धीने ध्यान करावे, म्हणजे परमेश्वर सिद्धीचे अडथळे दूर करतो. साधू सिद्धींचा उपयोग कधीही करीत नाहीत; ते परमात्मस्वरूपात मिळून गेलेले असतात. सर्व गोष्टी ते परमात्म्यावर सोपवितात आणि त्याच्या इच्छेनेच केव्हा केव्हा चमत्कार झाल्याचे साधूंच्या चरित्रात दिसते.

साधूजवळ कधीही व्यावहारिक गोष्टी मागू नयेत, त्या प्रारब्धावर सोपवाव्यात.




# साधे साधे प्रश्न...

ज्योतिर्मय साहित्य

‘‘प्रभू श्रीरामचंद्रांचा जन्म किती वाजता झाला?‘‘

श्रीकृष्णाचा जन्म किती वाजता झाला?

नृसिंह जन्म कुठल्या वेळी झाला?

हनुमंतांचा जन्म कुठल्या वेळी झाला?

अशा प्रकारचे काही प्रश्न मी डिसेंबर महिन्यातल्या एका सेशनमध्ये मुलामुलींना विचारले होते. समोर बसलेली सगळी मुलंमुली १३ ते २५ वयोगटातली, उच्चशिक्षित कुटुंबातली, आर्थिकदृष्ट्या सुबत्ता असलेली, नामांकित खाजगी शाळांमध्ये जाणारी होती. पण मी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं त्यांना देता आली नाहीत. मी त्यांना वेगवेगळ्या फळभाज्या, पालेभाज्या आणि फळं यांची नावं सांगून त्यांच्या सेवनातून आपल्याला कुठले घटक मिळतात, असं विचारलं. त्याचीही उत्तरं मिळाली नाहीत.

घरात तुम्ही एकटेच आहात आणि भूक लागली तर तुम्ही काय करुन खाल? असं विचारल्यावर जवळपास सगळ्यांनी मॅगी नूडल्स, पास्ता, जॅम टोस्ट अशी नावं सांगितली.

श्रावण महिन्यात आपल्या घरी कोणकोणते कार्यक्रम असतात?

गणपती विसर्जनाच्या दिवशी गणपती घरातून बाहेर पडताना आपण उंबऱ्यापाशी काय म्हणतो?

गुढीपाडवा, दसरा आणि दिवाळी पाडव्यादिवशी आपण सरस्वती पूजन किंवा पाटीपूजन करतो का? पाटीवरची सरस्वती काढता येते का?

पंचामृत कसं करतात? नैवेद्याचं पान कसं वाढतात? चैत्रांगण कसं काढतात?

चैत्रगौर म्हणजे काय? खंडेनवमीच्या दिवशी काय करतात? आषाढी एकादशीचं महत्त्व काय?

यापैकी एकाही प्रश्नाचं उत्तर एकालाही देता आलं नाही. मग मात्र मला जरा अस्वस्थता आली.

एका जुडीमध्ये किती दुर्वा असतात?, माळावस्त्र कसं करतात?, औक्षण कसं करतात - तेलाच्या दिव्यानं की तुपाच्या दिव्यानं?, पुरणाची आरती माहिती आहे का?, धोतर कसं नेसतात ? तुमचं कुलदैवत आणि कुलदेवता माहिती आहे का?... हे प्रश्न विचारले तेव्हाही हाच अनुभव आला. अनेकांनी तर ‘‘आमच्या घरी असे काही सणवार आम्ही करतच नाही. सगळे सण मोठ्या घरी असतात किंवा गावी असतात‘‘ अशी उत्तरं दिली. मुंज झालेल्यांना बहुतेक सगळ्यांना मुंज का करतात? हेही ठाऊक नव्हतं.

मुलांना श्लोक, वेचे येत नाहीत. संतांचे अभंग येत नाहीत, एक तेवढी गणपतीची सोडली तर बाकी आरत्या येत नाहीत. उत्तमोत्तम कवींच्या कविता येत नाहीत. त्यांनी प्रवासवर्णनं वाचलेली नाहीत. वाचनालयात जाण्याची सवय नाही. एखादं चार ओळींचं पत्र लिहिता येत नाही. पाकिटावर पत्ता कुठल्या क्रमानं लिहितात, ते माहिती नाही. फार तर गणपती स्तोत्र, रामरक्षा, मारुती स्तोत्र येतं. पण, महिषासुरमर्दिनी स्तोत्र, पांडुरंगाष्टक, भगवद्गीतेचे अध्याय, प्रज्ञाविवर्धन स्तोत्र, आदित्यहृदय स्तोत्र येत नाही. मनाचे श्लोक येत नाहीत, करुणाष्टके ठाऊक नाहीत. संपूर्ण वन्दे मातरम् सुद्धा ठाऊक नाही.

आपत्कालीन परिस्थितीत काय कराल ? असं विचारलं, तर तेही सांगता येईना. ॲम्ब्युलन्स कशी बोलवाल? गॅस सिलेंडर लिकेज असेल तर काय कराल? कुणी लिफ्ट मध्ये अडकलं तर काय कराल? सीसीटीव्ही फुटेज पाहता येतं का? ऑफलाईन रेल्वे रिझर्व्हेशन करता येतं का? बँकेत चेक भरता येतो का? वीजबिल वाचता येतं का? पुण्यात बस ने फिरता येईल का?

(क्रमशः)




# शिक्षण सर्वांनाच उपयोगाचं?

ज्योतिर्मय साहित्य

शेती करणारा वर्ग हा कमी शिकलेला आहे. ज्याला जास्त शिक्षण नसेल, तोही शेतीच करीत असतो. तो काबाडकष्ट करुन अन्न पिकवतो. ज्यातून आपल्याला अन्न मिळतं. परंतु ते जरी काबाडकष्ट करुन अन्न आपल्याला देत असले तरी आपल्याला त्यांच्या काबाडकष्टाची कीव येत नाही. तशी कीव जर आपल्याला आली असती तर आपण त्यांच्या मालाला भाव दिला असता. तो जरी अंगमेहनतीनं आपल्याला अन्नधान्य पुरवीत असला तरी आपल्याला त्याचं काहीही देणंघेणं नाही. आपण त्यांच्या मालाला कमी भाव देवून त्यांच्यावर जणू अत्याचारच करीत असतो आणि तोही अनाडी असल्यानं व मजबूर असल्यानं त्यावर काहीच बोलत नाही. ते अत्याचार त्याच्या लक्षात येत असतात. तरीही तो चूप बसतो. कारण त्याला ज्ञान नसतं. याऊलट त्यांचा माल विकत घेणाऱ्या शिक्षीत लोकांचं आहे. त्यांचा माल विकत घेणारा शिक्षीत वर्ग हा त्याच मालावर थोडीशी प्रक्रिया करतो व तोच माल दुगण्या भावात विकतो आणि पैसे कमवतो. त्या घटकाला असे कसे करता येते. त्याचं कारण आहे, शिक्षण. तो घटक शिकलेला असल्यानं त्याला हे सर्व करता येतात.

पुर्वीही शेतकरी हा सुखी नव्हता. कारण तो अशिक्षीतच होता व त्याला लुटणारा सावकार हा शिक्षीत घटक असल्यानं त्यानं आपली चतुराई लावून कित्येक शेतकऱ्यांकडून त्यांच्या जमीनी विकत घेतल्यात.

शिक्षण क्षेत्रात अध्ययन अध्यापनाची प्रक्रिया घडत असतांना शिक्षक नावाचा घटक हा जास्त मेहनत करीत असतो. तो शिकलेला असतो. परंतु त्याचं शिक्षण हे कमी झालेलं असतं. त्यातच त्याचेवर लक्ष ठेवून असलेला घटक अर्थात अधिकारी वर्ग हा जास्त शिकलेला असतो. त्यानंतर साहजीकच शिक्षकांवर अत्याचार होणारच. जोही अधिकारी येईल वा मंत्री येईल. तो सर्वांनाच आपलं शहाणपण साःगून जातोच. अशी शिक्षकांची अवस्था. शिक्षण हा गुलामच आहे या सर्व प्रक्रियेतील. त्याचेवर अत्याचार होत असला तरी तो काहीही बोलत नाही. प्रसंगी आत्महत्या करतो एक चिठ्ठी लिहून. परंतु परिस्थिती विरोधात तो कुठेही दाद मागू शकत नाही. मात्र त्याचेवर जरी अत्याचार होत असेल, तरी तो आपल्या कर्तव्याप्रती इमानदार असतो.

(क्रमशः)




# गजकर्णवर घरगुती उपाय

ज्योतिर्मय साहित्य

आज आपण गजकर्ण म्हणजे काय, हे होण्याची कारणे, लक्षणे आणि उपाय काय ते जाणून घेऊया.

गजकर्ण हे त्वचेच्या वरच्या भागात होते. वैद्यकीय परिभाषेत गजकर्णाला टिनीया () असे म्हणतात. हा आजार संसर्गजन्य असून एका व्यक्तीमुळे दुसऱ्या व्यक्तीला अगदी सहजपणे होतो.

गजकर्ण झाला की त्वचेवर एक गोलाकार लाल रंगाचा चट्टा उमटतो. ह्या चट्टयाला खूप खाज सुटते आणि तिथे आग आणि वेदना होतात.

गजकर्ण हे बाधित व्यक्तीचे कपडे, टॉवेल किंवा इतर वस्तु वापरल्यामुळे सहजपणे पसरते.

तर आज आपण जाणून घेऊया गजकर्ण, खरूज इत्यादि होण्याची कारणे, लक्षणे आणि त्यावरचे घरगुती उपाय.

गजकर्ण म्हणजे नक्की काय

गजकर्ण हे एक प्रकारचे इन्फेक्शन आहे.

अतिरिक्त प्रमाणात गोड किंवा मसालेदार पदार्थ खाणे, शिळे अन्न खाणे, उघड्यावरील अन्न खाणे आणि शरीराची स्वच्छता न राखणे ह्या कारणांमुळे त्वचेवर लालसर चट्टा उमटून तेथे खाज येणे, तो भाग लाल होणे अशी लक्षणे दिसतात. हेच गजकर्ण होय.

गजकर्णाचे चार प्रकार आहेत

१. टिनिया क्रूरीस ( ) ह्या प्रकारचे गजकर्ण हे सांध्यांमध्ये किंवा जांघा, नितंब अशा ठिकाणी होते.

२. टिनिया कॅपिटिस ( ) हे गजकर्ण डोक्याच्या वरील त्वचेला (टाळू / ) होते. हे सहसा लहान मुलांमध्ये जास्त आढळते आणि शाळेतून ह्याचा फैलाव जास्त प्रमाणात होतो. डोक्याच्या ज्या भागाला हे गजकर्ण होते तिथे हळूहळू टक्कल दिसू लागते.

३. टिनिया पीडिस ( ) हे गजकर्ण पावलांना होते. सार्वजनिक ठिकाणी चपला न घालता वावरल्यामुळे अशा प्रकारचे इन्फ`क्शन होऊ शकते.

४. टिनिया बार्बी ( ) हे गजकर्ण पुरुषांना दाढी येण्याच्या भागात आणि मानेवर होते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

सहसा हे तेथील केस अर्धवट तुटल्यामुळे होते. काही वेळा हे इन्फेक्शन सलून मध्ये सगळ्यांसाठी, त्याच स्वच्छ न केलेल्या वस्तु वापरण्यामुळे पसरते. म्हणून ह्याला बारबर्स ईच असे देखील नाव आहे.

कारणे

गजकर्ण हे एक इन्फेक्शन आहे. ह्या फंगस ने एकदा त्वचेवर शिरकाव केला की त्याची भराभर वाढ होते.

बाधित व्यक्ती एकमेकांच्या संपर्कात येऊन किंवा असे इन्फेक्शन झालेल्या पाळीव प्राण्याच्या संपर्कात येऊन सुद्धा हे झपाट्याने पसरते.

तसेच एकमेकांच्या टॉवेल, कंगवा, कपडे अशा वस्तु वापरल्यामुळे देखील हे इन्फेक्शन पसरते.

गजकर्ण आहे हे कसे ओळखावे (लक्षणे)

गजकर्ण झाला असता त्वचेच्या त्या भागाला खाज येते हे प्रमुख लक्षण आहे. त्याशिवाय

१. त्वचेच्या त्या भागाची आग होणे.

२. त्वचेवर लाल रंगाचा चट्टा दिसून येणे.

३. त्वचेवरील चट्टा गोल असून त्याच्या कडा लाल आणि पुरळ असलेल्या असणे.

४. त्वचेवर तो चट्टा उभरून वर आल्यासारखा दिसतो.

(क्रमशः)

# ‘एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी’ ललित संग्रहाचे लोकार्पण उत्साहात

## लेखनशैली, बोलीभाषा आणि वास्तवदर्शी कथनशैलीला दाद

**ज्योतिर्मय साहित्य**

**सातारा – दीपलक्ष्मी नागरी सहकारी पतसंस्थेतर्फे संगीता अरबुने लिखित व शब्दालय प्रकाशन प्रकाशित ‘एकसोबीस हरी पत्ती लौंग आणि मी’ या ललित लेखसंग्रहाचा लोकार्पण सोहळा व चर्चासत्र दीपलक्ष्मी सांस्कृतिक हॉल, शनिवार पेठ येथे पार पडले. कार्यक्रमाला साहित्य क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली.**

**कार्यक्रमाचे व्यासपीठ लेखिका ॲड. सीमंतिनी नूलकर, लेखिका व कवयित्री शिल्पा चिटणीस, ज्येष्ठ पत्रकार मुकुंद फडके तसेच विनीत म्हणून म.सा.प. कार्यवाह (पुणे) शिरीष चिटणीस यांनी व्यवस्थित सजवले होते.**

**‘‘शीर्षक आगळेवेगळे; लेखन शांत, संयत’’ सीमंतिनी नूलकर**

कार्यक्रमात ॲड. सीमंतिनी नूलकर म्हणाल्या, ‘‘या पुस्तकाचे शीर्षक आगळेवेगळे असल्यामुळेच माझे लक्ष वेधले. लेखिकेने स्वतःचे अनुभव लिहिले असले तरी हे आत्मचरित्र नाही. कोणताही आक्रस्ताळेपणा न करता शांत व संयत भाषेत व्यक्तिमत्व कसे आकाराला येते हे पुस्तक उलगडते. दोष न देणे हा त्यांच्या लेखनाचा मोठा गुण आहे. लेखनामधील टर्निंग पॉईंट्स अतिशय प्रभावी आहेत.’’

**‘‘बोलीभाषा प्रमाण मराठीला समृद्ध करते’’ शिल्पा चिटणीस**



लेखिका व कवयित्री शिल्पा चिटणीस म्हणाल्या, ‘‘संगीतात एक उत्तम कवयित्री दडलेली आहे. तिच्या कवितांचे पडसाद तिच्या लेखनात स्पष्ट उमटतात. तिची निर्मिती अत्यंत वास्तवदर्शी आहे. कुठेही बडेजाव नाही; संस्कृती, नातेसंबंध आणि बारीकसारीक प्रसंगांची सुंदर मांडणी पुस्तकभर दिसते. बोलीभाषा प्रमाण भाषेला समृद्ध करते, हे पुस्तक त्याचे उत्तम उदाहरण आहे. सार्वजनिक शौचालयाच्या बिकट अवस्थेचे लेखिकेने केलेले वर्णन विशेष उल्लेखनीय आहे. अश्या दुर्लक्षित विषयावर अत्यंत खुमासदार शैलीत लिखाण करणे हे लेखिकेचं कसब आहे. यावेळी त्यांनी संगीता अरबूने यांची, ‘‘बायका झुळझुळत ठेवतात आयुष्याचा पदर’’ या काव्यसंग्रहतील कविता सादर केली.

**‘‘आठवणींचा कोलाज; पुढील भागांची अपेक्षा’’ मुकुंद फडके**

ज्येष्ठ पत्रकार मुकुंद फडके म्हणाले, ‘‘शब्दालय प्रकाशनाचे हे साडेसातशेवे प्रकाशन आहे. आईचा शोध संपूर्ण लेखनामध्ये सतत जाणवतो. अस्पर्श विषयाला त्यांनी सहजतेने स्पर्श केलेला आहे. हा आठवणींचा कोलाज आहे. लेखिकेने दुःख सांगितले पण त्याचा बाऊ केला नाही. स्वतःला भूतकाळात ठेवून त्या लेखन करतात आणि वाचक मात्र त्याच्याशी जोडला जातो. पुस्तकाच्या पुढीलदुसऱ्या, तिसऱ्याभागांची अपेक्षा वाटते.’’

**‘‘लेखनाला सुगंधी वास; युवा पिढीसाठी आदर्श’’ शिरीष चिटणीस**

कार्यवाह शिरीष चिटणीस म्हणाले, ‘‘संगीतात शब्दांची ताकद अपूर्व आहे. त्या मुंबई साहित्य परिषदेवर निवडून आलेल्या आहेत तसेच सातारा ग्रंथमित्र पुरस्काराने गौरवण्यात आलेल्या आहेत. लोणंद, सातारा आणि वाठार परिसरातील अनुभवांचे जिवंत चित्रण पुस्तकात आढळते. खडतर परिस्थितीतून त्यांनी केलेली वाटचाल प्रेरणादायी आहे. पुस्तकातील प्रसंग सहजगत्या आपल्याशी जोडले जातात. युवा पिढीसाठी हे पुस्तक आदर्श आहे.’’

**‘‘सातारी बोली ही रांगोळी; तिच्यात सौंदर्य आहे’’ संगीता अरबुने**

समारोपात लेखिका संगीता अरबुने म्हणाल्या, ‘‘दीपलक्ष्मी पतसंस्था साताऱ्यात असे साहित्यिक उपक्रम राबवतेय हे अत्यंत कौतुकास्पद आहे. माझ्या लेखनातील सर्व आठवणी साताऱ्याशी निगडित आहेत. कलाकृतीच्या निर्मितीला वेळ लागतो; पाचसात वर्षांपूर्वी हे लिहिले असते तर इतकी प्रगल्भता आली नसती. कलाकाराला स्वातंत्र्य मिळाले की तो अधिक फुलतो मला ते लाभले. बोलीभाषा आपण जपली पाहिजे. सातारी बोली ही रांगोळी आहे, आणि तिच्यात दडलेले सौंदर्य मोठे आहे.’’ यावेळी सोनल अरबुने हिनेही आपले मनोगत व्यक्त केले.

**मान्यवरांची उपस्थिती :**

कार्यक्रमास डॉक्टर संदीप स्रोत्री, मोहन सुखटनकर, प्रा. संध्या चौगुले, गौतम भोसले, आप्पासा शालगर, मकरंद गोंधळी, अरुण कुलकर्णी, आनंदा ननावरे, बाळकृष्ण इंगळे, अनिल सुर्वे, डी. एम. पाटील, हणमंत खुडे, शेग्या गावित, संदीप जाधव, जगदीश खंडागळे, रमेश महामूलकर, विपुल लोहार, दत्तात्रय शिर्के, संदीप भोसले, विजय गव्हाळे आणि चंद्रकांत देवगड, शुभम बल्लाळ यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिरीष चिटणीस यांनी केले व सर्वांचे आभार मानले.

# स्त्रीशक्ती जीवनाचा मूळ आधार – डॉ. विद्यासागर

## जागर विश्वजननीचा ग्रंथाचे पुण्यात प्रकाशन


**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ आणि स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. पंडित भालचंद्र विद्यासागर यांनी स्त्रीशक्तीला जीवनाचा मूळ आधार म्हटले आहे. भारतीय परंपरेत स्त्रीशक्तीला आदराचे स्थान असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

विश्वकर्मा पब्लिकेशन्सतर्फे डॉ. कल्याणी हर्डीकर लिखित ‘जागर विश्वजननीचा’ या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. विद्यासागर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यात झाले. पुणे येथील श्रीवासुदेव निवासचे प्रधान विश्वस्त नारायणरत्न शरद जोशी महाराज यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते, लेखिका डॉ. कल्याणी हर्डीकर, विश्वकर्मा पब्लिकेशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल सोनी आणि संपादक संदीप तापकीर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. पंडित भालचंद्र विद्यासागर म्हणाले की, आजही स्त्रीशक्ती प्रकर्षाने पुढे येत असून त्याचे स्वागतच केले पाहिजे. स्त्रीशक्तीचा जागर भारतीय परंपरेत वैश्विक दृष्टिकोन ठेवून केला गेला आहे. स्त्रित्वाचा जागर म्हणजे पूजन, आकलन, नम्र स्वीकार आणि आचरण अपेक्षित आहे. स्त्री-पुरुष समानता म्हणजे स्त्रियांना विकासाच्या समान संधी मिळणे, त्यांच्यावर मानसिक आणि शारीरिक अत्याचार व अन्याय होऊ न देणे, त्यांना तुच्छ न लेखणे ही खरी समानता आहे. नारायणरत्न शरद जोशी महाराज यांनी स्त्रीला चैतन्यशक्ती आणि लक्ष्मी संबोधले. स्त्रियांचे अष्टभुजा आणि दशभुजा रूप समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवले पाहिजे, असे ते म्हणाले. संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्राचार्य डॉ. शिवाजीराव मोहिते यांनी स्त्री संतांची हस्तलिखिते संकलित करून त्यांचे साहित्य पुढे आणण्याची गरज व्यक्त केली. आजही मोजक्याच स्त्री संत साहित्यिकांचे साहित्य उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्येष्ठ पत्रकार वर्षा कुलकर्णी म्हणाल्या की, भारतीय संस्कृतीत स्त्रियांना आदराचे स्थान आहे. आपल्या संस्कृतीत




नदीलाही मातेचा दर्जा दिला आहे. पाश्चात्त्य देशातील विचारवंतही भारतीय अध्यात्म आणि परंपरेचा आधार घेत त्यांच्या समस्यांवर उत्तरे शोधत आहेत.

# ‘‘हिंदू धर्म आणि महिला‘‘ या विषयावरील सुनीता पेंढारकर यांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण

**ज्योतिर्मय साहित्य**

**पुणे –** नवी दिल्ली येथील श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाने ७ आणि ८ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये ‘‘हिंदुत्व के विमर्श : चुनौतियाँ, समाधान और भविष्य’’ या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते. या परिषदेत भारत आणि इतर देशातील अनेक विद्वान, संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञांनी भाग घेतला आणि हिंदुत्वाच्या तात्विक,सांस्कृतिक आणि सामाजिक परिमाणांवर तसेच त्याच्या समकालीन दृष्टिकोनावर विचारांची देवाणघेवाण केली.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत पुणे, महाराष्ट्र येथील सुनीता पेंढारकर यांनी ‘‘हिंदू धर्म आणि महिला’’ या विषयावर त्यांचा शोधनिबंध सादर केला. त्यांचा उद्देश असा होता की इसवी सन पूर्व काळापासून आपल्या हिंदू धर्मात महिलांना आदरणीय स्थान दिले गेले आहे. महिलांना अपमानित करण्याचा किंवा दडपण्याचा कधीही प्रयत्न झाला नाही.या शोधनिबंधात सुनीता यांनी हिंदू धर्म आणि इतर धर्मांमधील महिलांबाबतचा फरक सविस्तरपणे स्पष्ट केला आहे. पुरुष आणि महिलांच्या उत्पत्तीपासून, महिला शतकानुशतके विविध प्रकारची कामे करत आहेत.अत्यंत कठीण परिस्थितीत,प्रत्येक क्षेत्रात निर्भयपणे स्त्री शक्तीने संचार केला आहे. आपल्या नवीन पिढीला सुमारे २००० वर्षांचा इतिहास शिकवला पाहिजे,तरच प्रत्येक घरात दुर्गा आणि सरस्वती जन्माला येतील आणि भारत विश्व गुरु होईल.



या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अरुण कुमार हे प्रमुख पाहुणे आणि प्रमुख वक्ते होते.समारोप सत्रात, प्रमुख पाहुणे आणि वक्ते,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह डॉ.कृष्ण गोपाल यांनी सांगितले की, हिंदू समाजाने हिंदुत्व समजून घेणे आवश्यक आहे. हिंदुत्व ही एक आध्यात्मिक भावना आहे जी मनाच्या आत राहते. अध्यात्म म्हणजे भेदभावांचा अंत. भेदभावांच्या दृष्टीचा अंत झाल्यामुळे अभेदभावाच्या दृष्टीचा उदय होतो.

या परिषदेत दोन दिवस १६ समांतर सत्रे झाली, ज्यामध्ये १२० हून अधिक विद्वान आणि संशोधकांनी त्यांचे शोधनिबंध सादर केले. ब्रिटनमधील लुसी गेस्ट, बेल्जियममधील मार्टिन गुरविच आणि अमेरिकेतील क्रिस्टोफर शॅनन यांच्यासह विविध भारतीय राज्ये आणि विद्यापीठांमधील असंख्य संशोधकांनीही हिंदुत्व आणि त्याच्या प्रासंगिकतेबद्दल त्यांचे विचार मांडले.

सुनीता पेंढारकर यांच्या शोधनिबंधाची प्रशंसा करताना सत्राचे अध्यक्ष जनार्दन चौहान म्हणाले की, असे शोधनिबंध लिहिले पाहिजेत आणि सुनीता यांनी महिला सक्षमीकरणाची जी तेजस्वी प्रतिमा सर्वांसमोर मांडली आहे ती लक्षात ठेवली पाहिजे तिचा आदर्श सर्वांनी आपल्या मध्ये अंगिकारला पाहिजे. हा कार्यक्रम श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, भारतीय तत्वज्ञान संशोधन परिषद, विश्व संवाद केंद्र आणि दिल्ली विद्यापीठातील हिंदू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.










# श्री रामेश्वर धाम

**ज्योतिर्मय साहित्य**

प्रभू श्री रामचंद्रांनी रावणाच्या वधानंतर ब्रह्म हत्येचे पातक नाहीसे व्हावे म्हणून येथे शिवलिंग स्थापन केल्याचे सांगितले जाते. रावण हा दुराचारी होता, तरीही तो प्रकांड पंडित, वेदांचा जाणकार, महान शिवभक्त ब्राह्मण होता. म्हणून ब्रह्महत्तेचे हे पातक नष्ट होण्यासाठी प्रभू रामचंद्रांनी येथे शिवलिंगाची स्थापना केली.

वाल्मिकी रामायणात रामलिंग स्थापनेचा उल्लेख असा आहे.

*देव देव महादेव त्रैलोक्य हितकारक/ पूजितोसी मया भक्त्या तस्मादेव वरं प्रद//*

हे देवा मधील श्रेष्ठ महादेव. तीनही लोकांचे कल्याण करणारे आपण आहात. मी भक्तिभावाने तुमची पूजा केली आहे, म्हणून कृपया मला वरदान द्या.

इत्युक्ता पूजयामास राघव: परमेश्वरम् /
लिंग स्थाप्य समुद्रांते रामेश्वर इती स्मृतम//



असे म्हणून श्रीरामाने परमेश्वराची पूजा केली त्यांनी समुद्राकाठी एक लिंग स्थापन केले त्या लिंगाचे नाव रामेश्वर म्हणून प्रसिद्ध झाले.

ज्यावेळेस रावणाचा वध झाला, आणि प्रभू रामचंद्र ,सीता मातेसह लक्ष्मणासोबत परत श्रीलंकेहून भारतात आले, तेव्हा ब्रह्म हत्येचे पातक निरसन करण्यासाठी, त्यांनी रामेश्वरम येथेच एक शिवलिंग स्थापनेचे ठरविले, व शिवलिंग आणण्यास त्यांनी श्री मारुती रायांना आज्ञा केली. मारुती राय उड्डाण करून कैलास पर्वता कडे गेले. तिथून ते शिवलिंग आणणार होते. पण शिवलिंग प्रतिष्ठापणा करण्याचा निर्धारित मुहूर्त टळू लागला होता व अद्याप हनुमंत राय शिवलिंग घेऊन परत आले नव्हते, म्हणून समुद्रा काठची वाळू आणि दगड इत्यादी साहित्य घेऊन सीता मातेने एक शिवलिंग तयार केले व त्याचीच प्रतिष्ठापना रामेश्वर येथे झाली. इतक्यात मारुतीराय ही कैलास पर्वतावरून एक शिवलिंग घेऊन आले. आणि त्यांनी पाहिले की आपण येण्यापूर्वीच इथे दुसऱ्या शिवलिंगाची प्रतिष्ठापना करून झाली आहे. ते थोडेसे नाराज झाले, म्हणून प्रभू रामचंद्रांनी हनुमंत रायांनी आणलेले शिवलिंग सुद्धा तिथेच स्थापित केले. त्याला विश्व लिंग असे म्हणतात. व विश्व लिंगाची पूजा राम लिंगम च्या आधी करण्याच्या सूचना प्रभू रामचंद्राने दिल्याचे बोलले जाते, व आजही तीच प्रथा पाळली जाते.

स्कंद पुराणात या घटनेचा उल्लेख असा येतो

हनुमान कैलासात लिंग आनयत/
सितया स्थापत्ये पूर्व लिंग सुमहाद्युती//

या रामेश्वर तीर्थाचे महात्म्य असे आहे की येथे पापाची निवृत्ती होते स्कंद पुराणात याविषयी असा श्लोक आहे

रामेश्वरम् महास्थानम् पापनाशनमुत्तमम्/
दर्शनात्स्मरणात्प्राप्त्या सर्व पापै प्रमुच्यते//

रामेश्वर हे असे महास्थान आहे की याच्या दर्शनाने किंवा स्मरणाने सुद्धा सर्व पाप नष्ट होतात.

स्कंद पुराणात तेथील तीर्थ कुंडांचा उल्लेख खालील प्रमाणे येतो

एक विशंति तीर्थानी यस्मिन स्वात्वा नोमल: सर्व पाप विनर्मुक्तो विष्णूलोकम् सगच्छती//

रामेश्वरम येथे मंदिराच्या परिसरात २२ तीर्थे आहेत याशिवाय बाहेरही महत्त्वपूर्ण तीर्थे आहेत

१ अग्नितिर्थ

रामनाथ स्वामी मंदिराच्या पूर्वेकडील समुद्रकिनाऱ्यावर सीता मातेची अग्निपरीक्षा झाली होती. याच स्थळी सीता मातेला पवित्र करणारा यज्ञ केला गेला होता म्हणून इथे स्नान केल्याने सर्व पापे नाहीशी होतात, अशी मान्यता आहे.

अग्नि तिर्थे स्नानं कृत्वा सर्व पापे प्रमुच्चते//

२ वायू गुण तिर्थ

समुद्रकिनाऱ्यालगत दुसऱ्या ठिकाणी हे तीर्थ आहे हे वायू या देवतेशी संबंधित आहे. इथे स्नान केल्याने वातजन्य दोष नष्ट होतात.

३ संगम तिर्थ

येथे तीर्थराज गंगा व समुद्र यांच्या संगमाचे प्रतीक मानले जाते. गंगाजल अर्पण करून येथे रामेश्वर लिंगास अभिषेक करतात.

४ कोटि तिर्थ :-

ही मंदिराच्या परिसरातच आहे येथे लाखो देवांनी स्नान केले, म्हणून कोटी तीर्थ हे नाव पडले.

५ धनुष्य कोडी तीर्थ


**(क्रमशः)**



# आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात माईसाहेब डॉ.सविता भीमराव आंबेडकर होणार प्रदर्शित

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर –** माहिती आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार आणि नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कार्पोरेशन आयोजित ५६ वा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२५ गोवा येथे दि २० ते २८ नोव्हेंबर दरम्यान होत आहे. या महोत्सवातील वेव्हज् फिल्मबाजार या विभागात माईसाहेब डॉ. सविता भीमराव आंबेडकर हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनातील महत्त्वाच्या कार्यांपैकी संविधान निर्मिती, हिंदूकोड बिल, आणि धर्मांतर या कार्यांच्या वेळी बाबासाहेबांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांच्या प्रकृतीची काळजी घेत त्यांच्या कार्यात माईसाहेब आंबेडकरांनी हातभार लावला आहे. बाबासाहेबांच्या पश्चात माईसाहेबांना बाबासाहेबांच्या मारेकरी म्हणून हिनविण्यात आले. बाबासाहेबांना खरोखरच विष दिलं गेल होतं का? या मागील नेमके सत्य काय आहे, हे दाखविण्याचा प्रयत्न या चित्रपटात करण्यात आला आहे.




अवलोकितेश्वर प्रोडक्शन्स छत्रपती संभाजीनगर निर्मित या चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक, निर्माते प्रकाश त्रिभुवन आहेत. या चित्रपटात शैलेश दातार, पल्लवी पालकर, शंतनु मोघे, माधव अभ्यंकर, अनिल नगरकर, डॉ. विजयकुमार देशमुख, कमलेश सावंत, शाहिरा सीमा पाटील यांच्या प्रमुख भूमिका आहेत. त्या सोबतच छत्रपती संभाजीनगर येथील स्थानिक कलावंतांच्याही या चित्रपटात भूमिका आहेत. हा चित्रपट प्रदर्शनासाठी सज्ज झाला असून, लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

# आयएमए राज्य नेतृत्वात संभाजीनगरची दमदार एंट्री

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर** – आयएमएच्या महाराष्ट्र राज्य सहसचिवपदी छत्रपती संभाजीनगर येथील त्वचारोग तज्ज्ञ डॉ अनुपम टाकळकर यांची निवड झाली आहे. ही निवड २०२५ ते २०२६ या कार्यकाळासाठी करण्यात आली असून शहरातील वैद्यकीय क्षेत्रातून त्यांच्या निवडीचे स्वागत करण्यात येत आहे.



सोलापूर येथे पार पडलेल्या राज्य परिषदेतील नूतन पदाधिकाऱ्यांच्या पदग्रहण सोहळ्यात निवड जाहीर करण्यात आली. कार्यक्रमात सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ सचिन ओंबासे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलचे माजी अधिष्ठाता डॉ सुधीर नणदकर, आयएमएचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ हौसी कपड़िया, राष्ट्रीय सहसचिव डॉ हेमंत लुंगे, मावळते राज्याध्यक्ष डॉ संतोष कदम आणि माजी सचिव डॉ अनिल आव्हाड, भावी अध्यक्षा डॉ मंजुषा गिरी यांनी उपस्थित राहून नव्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. अध्यक्षपदी डॉ संतोष कुलकर्णी आणि सचिवपदी डॉ विक्रांत देसाई यांनी नियुक्ती स्विकारली. सहसचिव म्हणून डॉ अनुपम टाकळकर यांच्या नावाची घोषणा होताच सभागृहातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

आयएमए महाराष्ट्र राज्याच्या निवडणुकीत डॉ टाकळकर यांना सहसचिव आणि आयएमए मुख्यालयाच्या सेंट्रल वर्किंग कमिटी सदस्य म्हणूनही जबाबदारी देण्यात आली आहे. या निवडीबद्दल बोलताना डॉ टाकळकर म्हणाले की ही भूमिका स्विकारताना आनंद वाटतो. मिळालेला विश्वास महत्त्वाचा आहे आणि तो पुढील कामात प्रेरणा देईल. सदस्यांच्या हितासाठी ठोस निर्णय घेण्यावर माझा भर राहील. संघटनेच्या कामात अधिक सक्रियता आणि परिणामकारकता आणण्याचा प्रयत्न करेन. शुभेच्छा देणाऱ्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो.

त्याच निवडणुकीत शहरातील डॉ यशवंत गाडे यांची इलेक्शन कमिशन सदस्य आणि सेंट्रल वर्किंग कमिटी सदस्य म्हणून निवड झाली आहे. दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करेन. शहरासाठी हा आनंदाचा क्षण आहे. निष्पक्ष राहून निवडणूक अधिकारी म्हणून मी कार्य करेल, असे डॉ यशवंत गाडे म्हणाले.

तसेच डॉ राजेंद्र गांधी यांचीही सेंट्रल वर्किंग कमिटी सदस्य म्हणून निवड झाली आहे.



# फाउंडेशन इंटरनॅशनल स्कूलमध्ये बालदिन उत्साहात संपन्न

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर –** पंडित जवाहरलाल नेहरू जयंती अर्थात बालदिन म्हणून साजरा होतो. फाउंडेशन इंटरनॅशनल स्कूलमध्ये हा बालदिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर हे प्रमुख अतिथी म्हणून होते. सुरुवातीला पाहुण्यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन शाळेच्या संचालिका डॉ .सुवर्णा ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका मीरा देशमुख यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

सुधीर कोर्टीकर आपल्या मार्गदर्शनीय भाषणात म्हणाले. ज्ञानसंपन्नते बरोबर कलासंपन्न व्हा. कला, गुण, छंद जोपासा. आज जोपासलेले छंद भविष्यात तुमचं जीवन प्रकाशमान करणार आहेत. तुमच्या शिक्षकांच्या संस्कारातून ज्ञानसंपन्न व्हा. हेच ज्ञान स्पर्धेच्या युगात तुम्हाला दिशा देणारं आहे. विद्यार्थ्यांच्याआग्रहामुळे सुधीर कोर्टीकर यांनी अतिशय सुंदर मिमिक्रीचा कार्यक्रम करून मुलांना मनमुराद हासवले.

सुधीर कोर्टीकरांनी ५ हजार वर्षां पासूनच्या १५ हजार नाण्यांचा संग्रह तसेच १०० देशांच्या २५ हजार टपाल तिकीटांचा संग्रह केलेला आहे. विद्यार्थ्यांना प्राचिन संस्कृतीचे ज्ञान व्हावे म्हणून सुधीर कोर्टीकरांनी विद्यार्थ्यांना हा अनमोल खजिना दाखविण्यासाठी आणला होता. सर्व विद्यार्थ्यांना प्राचिन संग्रह पाहून विद्यार्थी खूप आनंदित झाले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी नृत्य, गायन, वक्तृत्व ह्यात आपला सहभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली. हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी रेणुका मोहरीकर, अनुप्रिता मॅडम, ज्योती डोळस, संदीप सर ह्यांनी परिश्रम घेतले. सगळ्या शिक्षकांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी रित्या पार पडला.

# आयुर्वेद ही भारताची अद्वितीय आणि प्राचीन चिकित्सापद्धती-मा. देवेंद्रजी फडणवीस

## श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय संशोधन केंद्र भवनाचे उद्घाटन

**ज्योतिर्मय साहित्य**
**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश टेक्निकल कॅम्पस, छत्रपती संभाजीनगर येथे श्रीयश आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय संशोधन केंद्राच्या नव्या इमारतीचे भव्य उद्घाटन महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय संशोधन केंद्राचे उद्घाटन करून महाविद्यालयाच्या आधुनिक सुविधांची पाहणी केली. श्रीयश प्रतिष्ठानचे चेयरमन श्री. बसवराज मंगरुळे यांनी मुख्यमंत्र्यांचा सत्कार करून त्यांचे मनःपूर्वक स्वागत आपल्या प्रास्ताविक भाषणात केले. प्रतिष्ठानच्या सचिव सौ. संगीता मंगरुळे, विश्वस्त कु. ऐश्वर्या मंगरुळे व संयुक्त सचिव श्री. अद्वैत मंगरुळे उपस्थित होते.

यानंतर मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना आयुर्वेदाचे प्राचीन वैद्यकीय परंपरेतील स्थान अधोरेखित केले. ''आयुर्वेद ही भारताची अद्वितीय आणि प्राचीन चिकित्सापद्धती असून चरक, सुश्रुत या महान ऋषींनी दिलेल्या ज्ञानाचा आजही जगभरात गौरव केला जातो. महर्षी सुश्रुतांनी प्राचीन काळातही गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया केल्या आहेत,'' असे ते म्हणाले. तसेच पुढे बोलताना ते म्हणाले की, ''भारत हा युवा देश असून औरिक, शेंद्रा-बिडकीन औद्योगिक वसाहत यांच्या माध्यमातून प्रचंड औद्योगिक विकास होत आहे. छत्रपती संभाजीनगर हे इलेक्ट्रिक वाहन उत्पादनाचे सर्वांत मोठे केंद्र बनले आहे. आगामी काळात भारत हा सर्वांत मोठा आर्थिक महासत्ता बनणार आहे,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाला मा. ना. श्री. अतुल सावे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपरंपारिकऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री, मा. खासदार डॉ. भागवत कराड, माजी केंद्रीय अर्थ राज्य मंत्री, भाजपचे श्री. शिरीष बोराळकर, श्री. अतुल शितोळे, श्री. विवेक देशपांडे यांसह अनेक स्थानिक नेते उपस्थित होते. तसेच औद्योगिक क्षेत्रातील गणमान्य मान्यवर उपस्थित होते. यात



उद्योगपती श्री. मानसिंग पवार, भोगले ऑटोचे चेअरमन श्री. रामचंद्र भोगले, रुचा ग्रुपचे प्रमोटर डायरेक्टर श्री. उमेश दाशरथी, सीएमआयएचे अध्यक्ष श्री. उत्सव माछर यांचा समावेश होता. सीएमआयए, मसिआ, सोलर असोसिएशन, व्यापारी महासंघाचे प्रतिनिधी देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रशासनातील प्रमुख अधिकारी म्हणून आयुक्त श्री. जी. श्रीकांत, एसीपी श्री. कल्याणकर, डीसीपी झोन २ श्री. प्रशांत स्वामी हे देखील उपस्थित होते.

श्रीयश प्रतिष्ठानचे मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, श्रीयश आयुर्वेदिक कॉलेजचे रग्णालय अधीक्षक डॉ. परेश देशमुख आणि अधिष्ठाता डॉ. स्वाती इटगी देखील उपस्थित होत्या. तसेच अभियांत्रिकी, पॉलिटेक्निक, फार्मसी, आयुर्वेद, मॅनेजमेंट आणि नर्सिंग महाविद्यालयांचे प्राचार्य, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिशा ग्रुपचे संचालक श्री. देवानंद कोटगिरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीयश प्रतिष्ठानचे प्रा. अनिल पालवे यांनी केले.

# आली मोठी शहाणी'च्या गोव्यातील चित्रीकरणाचा श्रीगणेशा !, हृता दुर्गुळे - सारंग साठ्ये पहिल्यांदाच एकत्र

**ज्योतिर्मय साहित्य**
काही दिवसांपूर्वी घोषित झालेल्या 'आली मोठी शहाणी' या चित्रपटाने प्रेक्षकांची उत्सुकता चांगलीच वाढवली आहे. आता या चित्रपटाच्या गोव्यातील चित्रीकरणाचा श्रीगणेशा झाला असून, या निमित्ताने प्रेक्षकांसमोर एक नवी आणि हटके जोडी झळकणार आहे ती म्हणजे हृता दुर्गुळे आणि सारंग साठ्येची! या दोघांची फ्रेश ऑनस्क्रीन केमिस्ट्री नेमकी कशी असणार, हे पाहाण्यासाठी प्रेक्षक आतुर आहेत. हृता तिच्या गोड आणि प्रभावी अभिनयासाठी ओळखली जाते, तर सारंगने नेहमीच वेगळ्या भूमिकांद्वारे प्रेक्षकांवर ठसा उमटवला आहे. त्यामुळे 'आली मोठी शहाणी'त दोघांची जोडी नेमकी कोणत्या कथानकातून झळकणार, याबद्दलची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.




दिग्दर्शक आनंद दिलीप गोखले म्हणाले, '' नुकतीच चित्रीकरणाला सुरुवात झाली असून प्रेक्षकांसाठी एक वेगळं आणि मनोरंजक कथानक घेऊन आम्ही येत आहोत. हृता आणि सारंगची जोडी नक्कीच सर्वांना आवडेल, याची मला खात्री आहे. संपूर्ण टीम या प्रवासासाठी खूप उत्सुक आहे.''


चित्रपटाचं शीर्षक 'आली मोठी शहाणी' जितकं आकर्षक, तितकंच ते कथानकाबद्दल कुतूहल निर्माण करणारं आहे. आता या हटके शीर्षकाखाली नेमकं काय घडणार आणि हृता-सारंगची जोडी प्रेक्षकांच्या मनात किती शहाणी ठरणार, हे पाहाणं उत्सुकतेचं ठरणार आहे! दरम्यान, या चित्रपटाचं लेखन व दिग्दर्शन आनंद दिलीप गोखले यांनी केलं आहे. 'फाईन ब्रू प्रॉडक्शन्स' प्रस्तुत आणि 'टू होप फिल्म वर्क्स'च्या सहयोगाने प्रेक्षकांच्या भेटीला येणाऱ्या या चित्रपटाचे निर्माते जयकुमार मुनोत, ईशा मूठे आणि श्रुती साठे आहेत.

# कवितेच्या लाटावर...




# कवितेच्या लाटावर...







हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559